# मेट्रो-३च्या ट्रेनचे पहिले ४ डबे मुंबईत दाखल

मुंबई (प्रतिनिधी) : मेट्रो ३ (कुलाबा-वांद्रे-सीप्झ) मार्गिकिसाठीच्या पहिल्या मेट्रो गाडीचे चार डबे अखेर मुंबईत दाखल झाले आहेत. आंध्र प्रदेशातील श्रीसिटी येथून दोन आठवड्यांपूर्वी ट्रेलर्समधून हे डबे मुंबईसाठी रवाना झाले होते. मंगळवारी पहाटे डबे मुंबईतील मरोळ-मरोशी येथील तात्पुरत्या कारशेडमध्ये दाखल झाले आहेत. हे प्रत्येकी ४२ टन वजनाचे चार डबे, ६४ चाकांसह विशेष ८-एक्सेल ट्रेलरद्धारे आणले गेले.

कुलाबा ते सीप्झ मेट्रो लाईन ३ या ३३ किमी लांबीच्या भूमिगत कामाला २०१६ मध्ये सुरुवात झाली होती. ज्यामध्ये संपूर्ण मार्गावर एकुण २६ भूमिगत स्टेशन आहेत. याचे अजूनही काम सुरू आहे. या प्रकल्पाची विभागणी १ आणि २ अशा दोन टप्प्यांत करण्यात आली आहे.